# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,

स्टेशन रोड, उस्मानपुरा, औरंगाबाद – ४३१ ००५

"In Pursuit of Global Competitiveness"

# निविदा अर्ज

# – जुने वसतीगृह मुलींचे –

## (कंत्राटीतत्वावर वसतीगृहाची खानावळ चालविण्यास देणेबाबतचा निविदा अर्ज)

**निविदा विक्री स्थळ** – विद्युत भांडार, विद्युत अभियांत्रिकी विभाग

**निविदा विक्री दिनांक** – १२/०९/२०१८ ते १०/१०/२०१८
(सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.०० पर्यंत ( फक्त कार्यालयीन दिवशी)

**निविदा स्विकृती दिनांक** – १२/०९/२०१८ ते १२/१०/२०१८
(सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.०० पर्यंत ( फक्त कार्यालयीन दिवशी)

**किंमत रूपये २०००/– मात्र (नापरतावा)**

मोहोरबंद लिफाफा 'ब' हा लिफाफा 'अ' मध्ये घालुन लिफाफा 'अ' मोहोरबंद स्थितीत
प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांचे कार्यालयात अंतिम दिनांकपुर्वी सादर करावा.

# निविदा अर्जासोबत सादर करीत असलेल्या कागदपत्रांचा तपशिल (अनिवार्य)

१. मुंबई शॉप अॅक्ट रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र

२. अनामत रक्कम रूपये ५०,०००/— चा प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबद यांचे नावे असलेला व औरंगाबाद येथे देय असलेला धनाकर्ष (डि.डि.)

३. व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र

४. व्यवसाय कर भरण्याचे चलान क्रमांक व दिनांक

५. जी.एस.टी. कर नोंदणी प्रमाणपत्र

६. मागील वर्षात जी.एस.टी. भरल्याच्या चलान रिटर्नच्या प्रती

७. कामगार भविष्या निर्वाह निधी (EPF) नोंदणी प्रमाणपत्र

८. P.F. भरण्याच्या गेल्या दोन वर्षातील चलानाचे क्रमांक व दिनांक

९. अन्न व औषध प्रशसनाचे नोंदणी प्रमाणपत्र

१०. खाद्य व पेय विक्रीचा सक्षम प्राधिकरणाचा अनुज्ञप्ती क्रमांक (प्रमाणपत्र) व दिनांक

११. किमान १५० पेक्षा जास्त सदस्य संख्या असलेल्या किमान पाच वर्षे खानावळ चालविण्याचा अनुभव असल्याचे प्रमाणपत्रांचा तपशिल

१२. रूपये १० लक्ष मुल्याचे राष्ट्रीयकृत / शेडयुल्ड बॅंकेचे सॉल्व्हन्सी प्रमाणपत्राचा तपशिल (मुळ प्रमाणपत्र जोडावे)

१३. निविदा खरेदी करण्यासाठी रूपये २,०००/— भरणा केल्याची मुळ पावती सोबत जोडावी

१४. रूपये १०० च्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र

१५. मागील तीन वर्षांचे आयकर विवरणपत्र व त्याची पोच

१६. भोजन ठेका बाबतचा परवाना, अन्नभेसळ प्रतिबंधक परवाना, संस्थेचा परवाना इत्यादी

१७. सध्या खानावळ चालवित असलेल्या संस्थांचा / वसतीगृहांचा संपूर्ण तपशिल, पत्ता, संपर्क क्रमांक व एकुण सदस्य संख्या

उपरोक्त वर्णनानुसार आवश्यक कागदपत्रांच्या सत्यप्रती सोबत जोडल्या आहेत.

स्थळ :— निविदाधारकाची स्वाक्षरी

दिनांक :— नाव :—

# खानावळ चालविण्यासंदर्भात आवश्यक विवरण

## १) माहिती :—

अ. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मुलींचे वसतीगृह (जुने) मध्ये सुमारे १२० विद्यार्थीनींना वसतीगृहात जेवण बंधनकारक राहील उर्वरीत विद्यार्थ्यांना वसतीगृहात जेवण ऐच्छिक राहील.

ब. दररोज विद्यार्थ्यांना सकाळी व सायंकाळी पोटभर सात्विक जेवण द्यावे लागेल.

## २) भोजनातील पदार्थ :—

| | विवरण |
|---|---|
| अ) | सोबत दिलेल्या अटी व नियमाप्रमाणे दोन वेळचे पोटभर जेवण (उत्तम प्रकारचा सात्विक आहार) खाली नमूद केल्याप्रमाणे —<br>१) तुर डाळीचे वरण (नामांकित डाळ मिल द्वारा उच्चप्रतीची)<br>२) पांढरा भात — (तांदूळ — एच.एम.टी/मदर इंडिया/चिन्नौर)<br>३) गव्हाच्या चपात्या (गहू — सरबती/नर्मदा/लोकवन)<br>४) एक रस्सेदार भाजी रोज सकाळी (आठवडयातुन किमान दोन वेळा पंजाबी डिश, कडधान्य आठवडयातुन केवळ दोन वेळा)<br>५) सुकी भाजी रोज सायंकाळी — (पालेभाजी, बटाटा, वांगे, दोडके, वा तत्सम तसेच कडधान्य आठवडयातुन फक्त दोन वेळा)<br>६) कांदा, निंबु, लोणचे, पापड, दही व चटणी इ.<br>७) मीठ आयोडिन युक्त,<br>८) हळद, तिखट, मसाले एगमार्क युक्त<br>९) तेल — शेंगदाना, सुर्यफुल, राईसब्रान मान्यताप्राप्त उत्पादकांचे एगमार्क/आयएसआय मार्क असलेले (इतर तेल वापरण्यास प्रतिबंध) |
| ब) | अंडाकरी (दोन अंडे) मर्यादीत डिश बुधवार (सायंकाळी) व रविवारी (सायंकाळी) फिस्ट असलेला दिवस वगळुन विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार (ऐच्छिक) |
| क) | गोड डिश जसे गुलाबजामुन, शिरा (ऐच्छिक) |

## ३) जेवणातील बदल:—

आठवडयातून एक दिवस बदल म्हणून जेवणासोबत एक तिखट किंवा गोड पदार्थाची डिश मर्यादीत स्वरूपात देण्यात यावी अशी डिश आठवडयातून एक वेळेस द्यावी.

## ४) फिस्ट मिष्टान्न:—

प्रत्येक महिन्यात एकवेळेस फिस्ट देण्यात यावी. फिस्ट शक्यतोवर रविवारी देण्यात यावी.
फिस्टचे पदार्थ वसतीगृह प्रमुखांशी चर्चा करून त्याचे सल्ल्याने ठरविण्यात यावे.
फिस्टचे दिवशी सायंकाळी जेवन दिले जाणार नाही.

## ५) गेस्ट चार्ज:—

गेस्ट चार्जचा दर मान्य केल्याप्रमाणे घेण्यात यावा. बाहेरील गेस्ट खानावळीत जेवणास येणार असल्यास संबंधिताने वसतीगृह कार्यालयातुन परवानगी घ्यावी. फिस्टच्या दिवशीचा गेस्ट चार्ज फिस्ट अनुसार वसतीगृह प्रमुखांचे सल्ल्यानुसार कळविण्यात यावा.

## ६) भोजनाबाबत काही महत्वाच्या अटी व शर्ती :—

१. कंत्राटदारास खानावळीच्या जागेचे दरमहा भाडे रू.३०००/— (तीन हजार रूपये मात्र) व विद्युत वापराचे प्रति युनिट रू. १०/— (दहा रूपये मात्र) महिन्याच्या दहा तारखेच्या आत संस्थेच्या रोखा विभागात भरावे लागेल.

२. सदर निविदा हे जेवणाचे सुयोग्य दर व सक्षम अनुभवी व्यक्तीची / संस्थेची खानावळ चालविण्यास निवड करण्यासाठी असून केवळ कमी दराच्या आधारे निविदा मंजुर होईल असे नाही.

**३. सदर निविदा ही शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय (स्वायत्त संस्था) औरंगाबाद येथील वसतीगृहाची खानावळ सुयोग्य दरात, सात्विक व पौष्टिक आहाराचा पुरवठा करणाऱ्या सक्षम खानावळचालकाचा शोध घेवुन खानावळ चालविण्यास देण्याकरिता असून केवळ दरांचे आधारे खानावळ चालविण्यास देण्यासाठी नाही. निविदांचे आधारे तसेच प्रत्यक्षात चौकशी करून व मुल्यमापन करून समितीच्या अंतिम पाहणीनुसार सक्षम खानावळ चालकास खानावळ चालविण्यास देण्याचा अंतिम निर्णयघेण्याचे संपूर्ण अधिकार समितीस प्राप्त आहेत.**

**४. निविदा उघडतांना प्रथम मोहोरबंद निविदा अ (तांत्रिक लिफाफा) उघडण्यात येईल. निविदा अ (तांत्रिक लिफाफा) यामध्ये आवश्यक ती सर्व कागदपत्रे त्याची सत्यता व अनुभव पडताळल्यानंतर संस्थेच्या नियमांनुसार खाणावळ चालविण्यास सक्षम असलेल्या निविदाधारकांचा लिफाफा ब (दरपत्रक लिफाफा) उघडण्यात येईल.**

५. आपली निविदा मंजुर झाल्यास आपणास त्वरीत रूपये २०००००/— (रूपये दोन लक्ष मात्र) सुरक्षा ठेव मेस सुरू करणेपुर्वी भरावी लागेल. त्यावर कसलेही व्याज मिळणार नाही. मुदत संपल्यावर ही रक्कम वापस मिळेल.

६. स्वयंपाकासाठी लागणारे इतर साहित्य उदा. अन्नधान्य, गॅस, दुध, भाज्या इ. स्वत: आणावे लागेल. सर्वांची देयके खानावळ चालकांनी स्वत: दयावीत त्याबाबतीत कोणीही व्यक्ती संस्थेशी (खानावळ चालकाला पुरविणेच्या सामानासाठी) संपर्क करणार नाही याची काळजी घ्यावी.

७. संस्थेमधील आपल्याला दिलेल्या ताब्यातील पंखे, टयुबलाईट, फर्निचर, भांडी व इतर शासकीय मालमत्ता गहाळ अथवा तूटफूट झाल्यास सदरील साहित्याची सद्यस्थितीत होणारी रक्कम खानावळचालकाकडून वसुल करणेत येईल किंवा आपण जमा केलेल्या सुरक्षाठेव रकमेतुन वसुल करण्यात येईल.

८. खानावळ मधील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा पगार खानावळ चालकांनी स्वत: द्यावा. काम करणारे कर्मचारी स्वच्छता बाळगणारे असावेत. त्या सर्वांचे वैद्यकीय प्रमाणपत्र फोटोसह सादर करावे लागेल. आवश्यक तेवढे कर्मचारी खानावळमध्ये कामासाठी ठेवावे लागतील. खानावळमध्ये बालकामगार नियुक्त करता येणार नाहीत. खानावळमधील कर्मचाऱ्यांना ड्रेसकोड असावा

९. खानावळ मधील काम करणाऱ्या कामगारांचा पी.एफ. कपात करणे आवश्यक राहील व त्याची प्रत वसतीगृह प्रमुख यांचेकडे वेळोवेळी सादर करावी लागेल. कामगारांचा कामगार विमा उतरविणे आवश्यक राहील. तसेच सर्व्हीस टॅक्स वेळोवेळी भरल्याच्या पावत्यासुध्दा वसतीगृह प्रमुख यांचेकडे सादर कराव्या लागतील.

१०. खानावळ चालकाने स्वत: व्यक्तिश: हजर राहुन खानावळ चालवावी लागेल. दुसऱ्या व्यक्तीस खानावळ चालविण्यास मनाई राहील.

**११. खानावळ चालकाने विद्यार्थीनीकडून दरमहा रक्कम महिन्याच्या १० तारखेच्या आत स्वत: जमा करून घ्यावी. त्याची जबाबदारी संस्थेवर राहणार नाही. तशी काही अडचण संस्थेस सांगु नये. १० तारखेपर्यंत रक्कम जमा न करणाऱ्या विद्यार्थीनींची यादी वसतीगृह प्रमुख यांचेकडे सादर करावी.**

१२. अगोदराच्या दिवशी तळण्यात आलेल्या पदार्थांचे तेल हे स्वयंपाक करतांना वापरण्यात येवु नये.

१३. विद्यार्थ्यांना जेवण वाढले जाईल, चपाती किंवा इतर जेवण वेळेत मिळेल याची दक्षता घ्यावी. जेवणासाठी विनाकारण जास्त वेळ लागणार नाही याची दक्षता घेणे बंधनकारक राहील.

१४. जेवतांणा शिस्त पाळणे सर्वांना बंधनकारक राहील.

१५. सात्विक शुध्द शाकाहारी जेवण देवून विद्यार्थ्यांसाठी प्रसन्न वातावरण तयार करावे.

१६. विद्यार्थीनींना जेवणामध्ये उत्तेजक पदार्थ देण्यास मनाई आहे. तसेच विडी, सिगारेट, तंबाखु, गुटखा, मद्यपान इत्यादी खानावळमध्ये ठेवता येणार नाही तसेच विद्यार्थीनींना देता येणार नाही.

१७. सदरील कराराचा कालावधी हा एक वर्षाचा असेल या कालवधीच्या आत आपणास खानावळ बंद करता येणार नाही. काही अपरिहार्य कारणासाठी खानावळ बंद करावयाची असल्यास कमीत कमी एक महिना अगोदर लेखी पुर्वसुचना द्यावी लागेल अन्यथा आपली सुरक्षाठेव रक्कम जप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी. एक वर्षाचा अनुभव व खानावळीचा दर्जा याआधारे सदर करार पुढील शैक्षणिक वर्षाकरिता नुतनीकरण करण्याचे संपुर्ण अधिकार संस्थेकडे सुरक्षित आहेत त्यासाठी जेवणाचे दरात महागाई लक्षात घेता दरवर्षी आठ टक्के दरवाढ मान्य करण्यात येईल.

१८. जेवणाच्या मेनुबाबत वसतीगृह प्रमुखांशी वेळोवेळी चर्चा करून मेनू निश्चित करावा.

१९. एका विद्यार्थीनींचे महिन्यातुन जास्तीत जास्त चार खाडे हिशोबात धरण्यात येतील. खाडयावर जाण्यापुर्वी पूर्व कल्पना देवुन खाडे नोंद वहीत नोंद करूनच जावे अशी सुचनाही आपण विद्यार्थ्यांस द्यावी.

२०. वसतीगृह प्रमुखांची पूर्व परवानगी घेवुनच खानावळीमध्ये गेस्ट ला जेवणाची परवानगी असेल.

२१. खानावळीचा दर्जा उत्तम नसल्यास व तशी वसतीगृह प्रमुख हयांची खात्री झाल्यास खानावळ बंद करण्याचा अधिकार संस्थेस राहील याची नोंद घ्यावी.

२२. जेवणाची वेळ सकाळी ८.३० ते १०.३० व सायं. ७.०० ते ९.०० पर्यंत असावी तरी जेवणाची वेळ विद्यार्थी, खानावळ समिती व खानावळ चालक यांचे चर्चेअंती निर्धारीत करावी. संस्थेबाहेरील विद्यार्थ्यांना / व्यक्तींना जेवण देता येणार नाही. असे आढळल्यास खानावळ चालकावर कार्यवाही करण्यात येईल.

२३. खानावळ चालकांनी स्वत:च संपूर्ण हिशोब ठेवायचा आहे. याची संपूर्ण जबाबदारी खानावळचालकाची राहील विद्यार्थ्यांचे ओळखपत्र पाहूनच जेवण देण्यात यावेत.

२४. जेवणाची भांडी स्वच्छ असावी तसेच खानावळहॉल, किचन, हात धुण्याची जागा व परिसर स्वच्छ ठेवावा.

२५. हिवाळी व उन्हाळी व पी.एल. (ज्या मुली कमीतकमी आठ दिवस) सुटीत विद्यार्थ्यांना आपल्या गावी जाण्यास परवानगी राहील. त्याची पूर्वसुचना खानावळचालकास विद्यार्थ्यांनी द्यावी इतर वेळेस बाहेर जातांना प्रोजेक्ट मार्गदर्शक व विभागप्रमुखांची परवानगी असेल तरच त्याचा विचार व्हावा व तेवढा कालावधी सुट द्यावी लागेल.

**२६. खानावळ चालकांचे विद्यार्थीनींशी काही दुमत असल्यास किंवा विद्यार्थ्यांना तक्रार असल्यास वादविवाद न करता, वसतीगृह अधिकारी किंवा वसतीगृह प्रमुख यांच्याशी संपर्क करावा.**

२७. खानावळ चालकाने सात्विक व पौष्टीक आहार देवुन घरगुती वातावरण निर्माण करावे, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे संबंध सलोख्याचे व आदराचे ठेवणेसाठी खानावळ चालकाने लक्ष घालावे. शांतता, मैत्रीपुर्ण, प्रसन्न वातावरण निर्माण करून पर्यायाने शैक्षणिक दर्जा उंचावण्याकरिता संस्थेस मदत करावी.

**२८. समितीने मान्य केलेल्या निविदाधारकास खानावळ चालविण्याचे आदेश दिल्यानंतर ३० दिवसांचे आंत खानावळ सुरू न केल्यास सदर निविदाधारकाची निविदा रद्द करून अनामत रक्कम जप्त केली जाईल. त्यानंतर दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या निविदाधारकास खानावळ चालविण्याकरिता देण्याचे अधिकार समितीस असुन त्याही निविदाधारकास ३० दिवसांचे आत खानावळ सुरू करणे बंधनकारक असेल त्यामुळे दुसऱ्या क्रमांकाचे निविदा धारकाची अनामत रक्कम किमान ६० दिवसानंतर परत केली जाईल.**